# प्रकरण पाचवे

## प्रकरण पाचवे

# गोषवारा आणि उपसंहार

५.१ नागरी सहकारी बँकांचा उगम

५.२ नागरी सहकारी बँकांची प्रगती

५.३ सभासदांच्या विकासात विटा नागरी सहकारी बँकेची भूमिका

५.३.१ भागभांडवल

५.३.२ खेळते भांडवल

५.३.३ सभासद

५.३.४ ठेवी

५.३.५ कर्ज

५.३.६ गुंतवणूक

५.३.७ उत्पन्न

५.३.८ खर्च

५.३.९ थकबाकी

५.३.१० नफा, तोटा व लाभांशाचा दर

५.३.११ अनिष्पादित मालमत्ता

५.४ 'दि विटा अर्बन को-ऑप. बँक लि., विटा' बँकेस सूचना

५.५ सर्वसामान्य सूचना

## प्रकरण ५ वे

# गोषवारा आणि उपसंहार

या प्रकरणात अभ्यासाचे महत्त्वाचे निष्कर्ष व सारांश मांडलेला आहे. त्याचबरोबर बँकेला आपली कार्यस्थिती सुधारण्यासाठी काही महत्त्वाच्या सुचना केलेल्या आहेत.

### ५.१ नागरी सहकारी बँकांचा उगम :

भारतात नागरी सहकारी बँकांची सुरुवात १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात झाली. भारतात १९०४ च्या सहकार कायद्याने सहकार चळवळीची मुहूर्तमेढ रोवली. सहकाराशिवाय मानवी प्रगती अशक्य आहे. आधुनिक सहकारी चळवळ ही अशक्य मानवी गरजातून निर्माण झालेली आहे. अशा अनेक प्रकारच्या अडचणी सोडविण्यासाठी अनेक प्रकारच्या सहकारी संस्था स्थापन झाल्या आहेत. बँकिंग सेवा सुविधा पुरविण्यासाठी सहकारी बँका भारतात स्थापन झाल्या आहेत. सहकारी बँकांची स्थापना प्रामुख्याने नागरी जनतेच्या गरजा लक्षात घेऊन झालेली असते. नागरी सहकारी बँका प्रथम जर्मनीमध्ये हॉमर्न शुल्झ यांनी स्थापन केली याच धरतीवर भारतात ५ फेब्रूवारी १८८९ रोजी कै. विठ्ठल लक्ष्मण कवठेकर यांनी "अन्योन्य सहकारी मंडळ" या नावाची पहिली नागरी सहकारी पतपुरवठा संस्था स्थापन केली.

### ५.२ नागरी सहकारी बँकांची प्रगती :

अनेक समितीद्वारे नागरी सहकारी बँकांचा अभ्यास करण्यात आला. त्या द्वारे त्याच्या प्रगतीसाठी मोठ्या प्रमाणात प्रयत्न करण्यात आले. भारतामध्ये सन २००६ पर्यंत १८५३ एवढ्या नागरी सहकारी बँकांची स्थापन झालेली आहे.

इतर राज्यांचा विचार करता महाराष्ट्रात नागरी सहकारी बँकांची प्रगती समाधानकारक असल्याचे दिसून येते सन २००४ पर्यंत महाराष्ट्रात ६३४ एवढ्या नागरी सहकारी बँका होत्या. महाराष्ट्राप्रमाणेच सांगली जिल्ह्यातील सन २००५ अखेर ३० नागरी सहकारी बँकांची संख्या असलेली दिसून येते त्यापैकी ३ नागरी सहकारी बँका खानापूर तालुक्यात आहेत.

त्यापैकी 'दि विटा अर्बन को-ऑप. बँक लि., विटा ही एक बँक असून तिची स्थापना १५-३-१९७२ रोजी झाली आहे.

## ५.३ 'सभासदांच्या आर्थिक विकासात विटा नागरी सहकारी बँकेची भूमिका'

'सभासदांच्या आर्थिक विकासात विटा नागरी सहकारी बँकेची भूमिका' अभ्यासण्यासाठी खालील घटकांचा अभ्यास करण्यात आला.

**५.३.१ भागभांडवल :** भागभांडवल हा बँकेच्या व्यवहारात महत्त्वाचा घटक असल्याने बँकेच्या सन १९९५ ते २००५ या कालावधीत बँकेच्या भागभांडवलात मोठ्या प्रमाणात वाढ होत गेल्याचे तक्ता क्र. ४.१ वरून स्पष्ट होते अभ्यासाच्या कालखंडामध्ये १६.०८% सरासरी वार्षिक वाढ झाल्याचे दिसून येते.

**५.३.२ खेळते भांडवल :** बँकेच्या खेळत्या भांडवलावरून बँकेची उत्पन्न मिळविण्याची क्षमता निश्चित होते. खेळते भांडवल जास्त असल्यास उत्पन्न मिळविण्याची क्षमता जास्त असते. आणि खेळते भांडवल कमी असल्यास उत्पन्न मिळविण्याची क्षमता कमी असते. तक्ता क्र. ४.२ मध्ये 'दि विटा अर्बन को-ऑप. बँक लि., विटा बँकेच्या सभासदामध्ये अभ्यासाच्या कालखंडामध्ये सतत वाढ होत गेल्याचे दिसते. सभासद हा बँकेचा महत्त्वाचा घटक मानला जातो. बँक विकासात सभासद हा महत्त्वाचा निकष असतो. त्यावर बँकेची प्रगती व विकास अवलंबून असतो. नियमित सभासदामध्ये वाढ झाल्याचे तर नामपात्र सभासदामध्ये घट झाल्याचे तक्ता क्र. ४.३ मध्ये दिसून येते. बँकेचे नामपात्र सभासद कमी होत आहेत म्हणजेच बँक कर्जवसुलीला प्राधान्य देत असल्याचे दिसून येते.

**५.३.३ सभासद :** दि विटा अर्बन को-ऑप. बँक लि., विटा बँकेच्या सभासदांमध्ये अभ्यासाच्या कालावधीत सतत वाढ होत गेल्याचे दिसते. सभासद हा बँकेचा महत्त्वाचा घटक मानला जातो. बँक विकासात सभासद हा महत्त्वाचा निकष असतो. त्यावर बँकेची प्रगती व विकास अवलंबून असतो. नियमित सभासदांमध्ये वाढ झाल्याचे, तर नाममात्र सभासदांमध्ये घट झाल्याचे तक्ता क्र. ४.३ मध्ये दिसून येते. बँकेचे नाममात्र सभासद कमी होत आहेत. म्हणजे

बँक कर्जवसुलीला प्राधान्य देत असल्याचे दिसून येते.

**५.३.४ ठेवी :** ठेवीवरून बँकेंचे आर्थिक सामर्थ्य स्पष्ट होत असते. बँक ज्या प्रमाणात ठेवी निर्माण करीत असते त्या प्रमाणात त्या जनतेमध्ये विश्वास निर्माण करीत असतात. ठेवी कर्ज निर्माण करतात आणि कर्जे बँकेला नफ्याकडे नेत असतात हे यावरून सिद्ध होते. तक्ता क्र. ४.४ वरून हे स्पष्ट होते की बँकेच्या ठेवी अभ्यास कालखंडामध्ये पहिली आठ वर्ष सतत वाढत आहेत परंतू शेवटच्या दोन वर्षात बँकेच्या ठेवीमध्ये घट झालेली दिसून येते. अभ्यास कालखंडामध्ये ठेवी सरासरी १०.७४% सरासरी वार्षिक वाढ झाली आहे. तर सरासरी ८.६% एवढी वार्षिक घट झाली आहे.

**५.३.५ कर्ज :** बँकेला आपला दैनंदिन खर्च भागविण्यासाठी त्याचबरोबर इतर खर्चाची तडजोड करण्यासाठी व नफा मिळविण्यासाठी कर्जे द्यावी लागतात. कर्ज ही बँकेची लाभप्रदता ठरविणारी महत्त्वाची घटक आहे. त्यामुळे दिलेली कर्ज, कर्जाची कारणे, कर्जपुरवठ्यातील बदल बँक विकासाची दिशा निश्चित करतात. त्याचबरोबर बँकेला अग्रक्रम क्षेत्रासाठी ६0% कर्जपुरवठा व दुर्बल घटकांसाठी १५% कर्जपुरवठा करावा लागतो अभ्यास कालखंडामध्ये बँकेने हे उद्दिष्ट पूर्ण केले आहे बँकेच्या सन १९९५ ते २00५ या कालावधीत ९.२६% सरासरीने वार्षिक कर्जात वाढ झाली आहे हे तक्ता क्र. ४.६ वरून स्पष्ट होते तर क्र. ४.७ वरून तारणी व विनातारणी कर्जाची विभागणी कशा प्रकारची आहे हे स्पष्ट होते कर्जाची विभागणी प्रामुख्याने अल्पमुदत, मध्यममुदत व दीर्घमुदत अशा प्रकारची आहे याची माहिती तक्ता क्र. ४.८ वरून स्पष्ट होते.

तक्ता क्र. ४.९ मध्ये बँकेने अग्रक्रम व दुर्बल घटकांना कशापद्धतीने कर्जपुरवठा केला आहे हे स्पष्ट होते. त्याचबरोबर बँकेने केलेला सोनेतारण, स्थावरतारण, नजरगहण तारण, वाहनतारण, ठेवतारण, सरकारी रोखे तारण या द्वारे केलेला कर्जपुरवठा कशापद्धतीने आहे याची संपूर्ण माहिती घेतलेली आहे.

**५.३.६ गुंतवणूक :** बँकेच्या अनेक कार्यापैकी एक कार्य म्हणजे गुंतवणूक धोरण होय. बँकेला विश्वास पात्रतेसाठी तसेच तरलतेसंबंधी



BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

कायदेशीर तरतुदी पूर्ण करून गरजेनुसार ते किमान रोकड प्रतिदिन उपलब्ध होऊ शकेल अशा रीतीने गूंतवणूक करावी लागते. 'दि विटा अर्बन को-ऑप. बँक लि., विटा' बँकेने सन १९९५ ते २००५ या कालावधीत सन २००३-२००४ व २००४-०५ हा कालखंड वगळता बँकेच्या गुंतवणुकीत वाढ होत गेल्याचे दिसून येते ही बाब तक्ता क्र. ४.१६ वरून स्पष्ट होते. सन १९९५-९६ ते २००२-२००३ या कालावधीत सरासरी १४.२२ टक्क्यांनी वार्षिक वाढ झाली आहे, तर सरासरी १.२३ टक्क्यांनी वार्षिक घट झाली आहे, यावरून बँकेची प्रगती समजू शकते.

**५.३.७ उत्पन्न :** 'दि विटा अर्बन को-ऑप. बँक लि., विटा' बँकेच्या उत्पन्नात सन १९९५ ते २००५ या कालखंडात कशा प्रकारे बदल होत गेला याची माहिती तक्ता क्र. ४.१८ मध्ये दिली आहे. सनै १९९५ ते २००५ या कालावधीत एकूण उत्पन्नामध्ये सतत वाढ होत गेली आहे. परंतु सन १९९८-९९, २००३-०४ व २००४-०५ या वर्षी उत्पन्नात घट झाली आहे. अभ्यास कालखंडात सरासरी १५.७२% वार्षिक वाढीची प्रवृत्ती दिसून येते. यामध्ये मिळालेले व्याज, कमिशन हुंडणावळ व दलाली, गुंतवणुकीवरील व्याज, यावरील उत्पन्न सर्वाधिक असल्याचे दिसून येते.

**५.३.८ खर्च :** 'दि विटा अर्बन को-ऑप. बँक लि., विटा' बँकेच्या अभ्यासाच्या सन १९९५ ते २००५ या कालखंडामध्ये काही वर्षाचा अपवाद वगळता बँकेचा खर्च वाढत गेल्याचे दिसून येते बँकेच्या वाढत गेल्याचे दिसून येते बँकेच्या वाढत जाणारा खर्च तक्ता क्र. ४.१९ वरून स्पष्ट होते या कालावधीत सरासरी १३.७७% नी वार्षिक वाढ झाल्याचे दिसून येते. बँकेने उत्पन्न व खर्चाचा ताळेबंद समान ठेवण्याचा प्रयत्न केलेला आहे. तोटा झालेल्या वर्षात ताळेबंद समतोल करण्यासाठी तोटा दाखवून "संशयित व बुडीत कर्जनिधी" तयार करून समतोल करण्याचा प्रयत्न केला आहे.

**५.३.९ थकबाकी :** 'दि विटा अर्बन को-ऑप. बँक लि., विटा' बँकेची सन १९९५ ते २००५ या कालावधीतील थकबाकी कशा पद्धतीने वाढत गेली आहे याची माहिती तक्ता क्र. ४.२० मध्ये स्पष्ट केली आहे. दहा वर्षाच्या कालावधीमध्ये सरासरी २२.१% वार्षिक थकबाकी वाढत गेली आहे.

एकूण कर्जाशी थकबाकीच्या प्रमाणात चढ उतार होत असल्याचे दिसून येते परंतू २००३-०४ व २००४-०५ या कालावधीमध्ये एकुण कर्जाशी असलेले थकबाकीचे प्रमाण वाढत असल्याचे दिसून येते ही बाब बँकेच्या दृष्टीने चिंताजनक असल्याचे दिसते.

**५.३.१० नफा, तोटा व लाभांशाचा दर :** 'दि विटा अर्बन को-ऑप. बँक लि., विटा' बँकेची सन १९९५ ते २००५ या कालावधीतील नफा, तोटा व लाभांशाची माहिती तक्ता क्र. ४.२२ मध्ये दर्शवली आहे अभ्यासाच्या कालावधीत १९९५-९६ ते २००१-२००२ पर्यंत बँकेला नफा झाला आहे. नफ्याची सरासरी वाढीची प्रवृत्ती ११.६५% एवढी वार्षिक राहिली आहे. तर शेवटच्या तीन वर्षात बँकेला तोटा झाला आहे. बँकेने वसुली भांडवलावर दिलेल्या लाभांशाची सरासरी ५.२४% एवढी वार्षिक असल्याचे दिसते. बँकेला वाढत जाणारा तोटा बँकेच्या प्रगतीच्या दृष्टीने अडथळा ठरत आहे. बँकेला तोटा कमी करण्यात मोठ्या प्रमाणात अपयश आले आहे.

**५.३.११ अनिष्पादित मालमत्ता :** 'दि विटा अर्बन को-ऑप. बँक लि., विटा' बँकेची सन १९९५ ते २००५ या कालावधीती अनिष्पादित झालेली मालमत्ता तक्ता क्र. ४.२३ मध्ये दर्शवली आहे अभ्यासाच्या कालखंडामध्ये सरासरी ८.५३%नी वार्षिक वाढ एन्. पी. ए. मध्ये झाल्याचे दिसून येते त्यासाठी बँकेने तरतूद रक्कमसुद्धा उभा केलेली दिसून येते परंतु ही रक्कम एन्. पी. ए. झालेल्या कर्जाच्या टक्केवारीपेक्षा फारच कमी असलेली दिसते. म्हणजेच बँकेला आपली कर्जवसुली करण्यात मोठ्या प्रमाणात अपयश आल्याने बँकेच्या अनिष्पादित मालमत्तेच्या प्रमाणात प्रचंड वाढ झाल्याचे दिसून येते.

## ५.४ 'दि विटा अर्बन को-ऑप. बँक लि., विटा' बँकेस सूचना

१) बँकेने आपल्या ठेवी आणि कर्जविषयक योजना विविध आर्थिक गटामध्ये लोकप्रिय करण्यासाठी आकर्षक जाहिरातींचा मार्ग अनुसरला पाहिजे. केवळ लोकांच्या सदिच्छेवर अवलंबून राहता येणार नाही. स्पर्धा तीव्र बनत आहे. त्यासाठी बँकेने जाहिरात, व्यक्तिगत संपर्क, प्रबोधन असे मार्ग अनसरून बँकेच्या ठेवी व कर्ज व्यवहार वाढवण्यावर मोठ्या प्रमाणात भर दिला पाहिजे.

२) बँकेने जनतेमध्ये विश्वास निर्माण करण्यासाठी ठेवी वाढवाव्यात, कर्जाचे प्रमाण व स्वरूप यात वाढ करावी, दिलेली कर्जे त्याच कारणांसाठी कर्जदार वापरतात किंवा नाही यावर नियंत्रण ठेवावे. लोकांमध्ये आपली बँक आहे, असा विश्वास निर्माण करावा.

३) स्पर्धेच्या युगात टिकावयाचे असल्यास बँकेला आपली कार्यक्षमता वाढविणे व सिद्ध करणे आवश्यक आहे.

४) प्रत्येक बँकेप्रमाणे बँकेस कर्जवसुली ही डोकेदुखी होऊन बसली आहे. भविष्यकाळात कर्जवसुलीकडे बँकेला फार लक्ष द्यावे लागेल, कारण थकबाकीची तरतूद आपल्या नफ्यातून करावी लागते, परंतु बँकेस नफा होत नसल्यास तोटा दाखवून 'संशयित व बुडीत कर्जनिधी' तयार करावा लागत आहे. थकबाकीचा प्रश्न सुलभ झाल्यास इतर प्रश्न सुटू शकतात. यासाठी थकबाकी कमी करण्याचा प्रयत्न बँकेने करणे आवश्यक आहे.

५) भविष्यात तग न धरू पाहणाऱ्या बँकेचे इतर बँकेत विलीनीकरण होण्यास सुरुवात झाली आहे. यासाठी बँकेने नफा वाढविणे गरजेचे आहे. नफा वाढविण्यासाठी बँकेने आपला प्रशासनावरील खर्च कमी करणे गरजेचे आहे. काटकसरीचे तथ्य पुरेपूर अंमलात आणणे महत्त्वाचे आहे.

६) ग्राहक हे खऱ्या अर्थाने बँकेचे देव असतात, त्यामुळे बँकेतील सर्व घटकांनी त्यांना सौजन्यपूर्वक वागणूक देणे, त्याचबरोबर त्यांना कौशल्यपूर्णरित्या हाताळणे गरजेचे आहे.

७) बँकेची कर्जवसुली होण्यासाठी तसेच थकबाकी कमी करण्यासाठी योग्य त्या तारणावर कर्जे दिली गेली पाहिजेत. तसेच हे तारण तरल स्वरूपाचे असल्यास बँकेला कर्ज वसुली करण्यात फारशा अडचणी येणार नाहीत. यादृष्टीने बँकेने कर्ज देताना दक्षता घ्यावयाची आहे.

८) बँकेने गुंतवणूक करताना अशाप्रकारे करावयास पाहिजे की, जो धोका आहे त्या धोक्याचे विभाजन झाले पाहिजे व बँकेच्या गरजेनुसार बँकेस संपत्तीची उपलब्धता होऊन बँकेचे दैनंदिन व्यवहार सुलभरित्या चालेल अशाप्रकारे गुंतवणूक करणे आवश्यक आहे.

९) बँकेस दैनंदिन खर्च कामगारांचे वेतन देण्यासाठी व लाभांशाचे वाटप करण्यासाठी नफा मिळविणे आवश्यक असून बँकेने शेअर बाजारात

गुंतवणूक करण्याची आवश्यकता आहे. त्यातील गुंतवणूक वाढणे आवश्यक आहे याकडे बँकेने लक्ष देणे गरजेचे आहे.

१०) बँकेने नफा व जनतेमध्ये विश्वास वाढविण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करावेत.

११) बँकेने इतर आर्थिक संस्थांशी स्पर्धा करून आपल्याकडे अधिक ठेवी खेचून घेण्यासाठी काही काही नव्या ठेव योजना सुरू कराव्यात व ठेवी वाढविण्याचा प्रयत्न करावा.

१२) बँकेने प्रत्यक्षात चालणाऱ्या व्यवहाराची कल्पना यावी यासाठी महाविद्यालयातून वाणिज्य शाखेत शिक्षण घेणाऱ्या थोड्या-थोड्या विद्यार्थ्यांना बँकेच्या कामकाजात विशिष्ट कालावधीकरिता अशारितीने सामावून घ्यावे की, जेणेकरून त्यांना बँकिंग क्षेत्रातील व्यवहाराबद्दलची माहिती येईल.

१३) प्रत्येक वर्षी सहकारी सप्ताहात सहकार मेळावे, प्रदर्शन आणि व्याख्याने आयोजित करून सहकाराची प्रेरणा लोकांमध्ये वाढवावी, लोकांना बचतीचे महत्त्व पटवून द्यावे व सहकाराचा प्रसार करावा.

१४) बँकेने सुसज्ज अंतर्गत यंत्रणा, देवाणघेवाणीची अत्याधुनिक साधने व पूर्ण संगणकीकरण ही आजच्या बँकिंग व्यवसायाची गरज लक्षात घेता त्याप्रमाणे आवश्यक ते बदल करावेत. संगणकाचा मोठ्या प्रमाणात वापर करून तत्पर सेवा उपलब्ध करून देणे आवश्यक आहे.

१५) बँकेच्या आधुनिकीकरणाबरोबरच कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देणे आवश्यक आहे. ग्राहकांना योग्य प्रकारे व सौजन्यपूर्ण वागणूक, बँकेचे आधुनिक व प्रगत व्यवहार यासाठी कर्मचारी प्रशिक्षण आवश्यक आहे.

१६) बँकेने अनिष्पादित मालमत्ता कमी करण्यासाठी मोठ्या प्रमाणात प्रयत्न करावेत, बँकेची वाढत जाणारी अनिष्पादित मालमत्ता कमी करून मोठ्या प्रमाणात बँक व्यवस्थेत सुधारणा करणे गरजेचे आहे. त्यासाठी संचालक मंडळाने योग्य ते प्रयत्न करावेत.

१७) भविष्यात बँकेने शाखा विस्तार करणे आवश्यक आहे. त्यानुसार संचालक मंडळाने बँकेच्या शाखा विस्तार करण्यासाठी योग्य ती कार्यवाही करावी व ग्राहकांना विविध सुविधा उपलब्ध करून द्याव्यात.

## ५.५ सर्वसामान्य सूचना :

१) भारतीय रिझर्व्ह बँकेने जाहीर केलेल्या पतधोरणामुळे महाराष्ट्रातील शेड्युल्ड नागरी बँका वगळता इतर नागरी सहकारी बँकांपुढे पेचप्रसंग उद्भवणार असल्याची भीती व्यक्त केली जात आहे. नव्या पतधोरणानुसार आता २ लाख रुपयांपेक्षा अधिक रकमेच्या कर्जावरमुक्त व्याज दर आकारण्याची मुभा बँकांना दिली गेली आहे. ज्या नागरी सहकारी बँका मोठ्या व सबळ आहेत त्यांना व इतर दुर्बल बँकांना एकाच मापाने मोजता येणार नाही. सबळ बँका ठेवीवर जास्त व्याज देऊ शकतील व कमी दरात कर्ज वाटू शकतील. मुख्यत्वे छोट्या दुर्बल नागरी सहकारी बँकांना हे जमत नाही. दुर्बल नागरी बँकांना भविष्यात थकबाकीचे प्रमाण कमी करून स्वतःची आर्थिक परिस्थिती सुधारण्याशिवाय पर्याय नाही.

२) रिझर्व्ह बँकेच्या धोरणाने बँकेच्या ठेवी व कर्जावरील व्याजदरात वारंवार बदल करण्यात येत आहेत ठेव व्याजदर वाढविताना व त्यानंतर कमी करताना बँकाच्या नफ्यावर त्यामुळे होणाऱ्या परिणामाचा विचार आजपर्यंत तरी झालेला नाही. एकदा जास्त दराने ठेवी स्वीकारल्यानंतर तिची मुदत संपेपर्यंत त्यावर त्याच दराने व्याज घ्यावे लागते. भाग नव्या धोरणामुळे व्याजदरात त्वरीत कपात करावी लागते. त्यामुळे नागरी बँकांना नफ्याला मुकावे लागते.

३) भारतातील सहकारी बँकांची प्रगती काळजी करावी इतपत नाजूक बनली आहे. नरसिंहम समितीच्या शिफारशींची अमंलबजावणी सुरु झाल्यानंतर ३१ मार्च १९९३ पासून विविधी बँकाच्या वार्षिक अहवालातून त्याचे इष्ट, अनिष्ठ, परिणाम दिसून येत आहेत त्याला महत्त्वाची कारणे अशी अनेक आहेत त्यात सरकारने अनेक कर्जयोजना जाहिर केल्या आहेत. व त्या राबविण्यावर व यशस्वी करण्यावर बँकांना सक्ती करण्यात आली. अशा सक्तीच्या कर्जवसुलीवर परिणाम होऊ लागला परिणामी अनियमित व थकीत कर्जाचे प्रमाण मोठ्या प्रमाणावर वाढू लागले. याबरोबर कर्ज वसुलीबाबत झालेले दुर्लक्ष व अनियमित कर्जवसुलीसाठी परिणामकारक उपाययोजनांचा अभाव व या दोन्ही बाबी थकीत कर्जाचे प्रमाण वाढविण्यास

कारणीभूत ठरल्या.

थकीत व बुडीत कर्जासाठी दरवर्षी तरतूदी कराव्या लागतात. नरसिहम समितीच्या शिफारशींची अमंलबजावणी करण्यापूर्वी अशा तरतूदी करणे अथवा न करणे हे सर्वस्वी बँकेवर अवलंबून होते. त्याबाबतची काटेकोर अमंलबजावणी नव्हती. त्यामुळे बँकांनी आपल्या सोयीनुसार अशा तरतूदी करण्यामध्ये चालढकल करून संशयित व बुडीत कर्जाचा बोजा वाढू दिला.

गतवर्षीपेक्षा चालू वर्षात थकीत व बुडीत कर्ज खात्यावर तरतूदी खात्यावर करताना वसूल न झालेल्या व्याजाबरोबर जमा न झालेल्या कर्जाचे हप्तेही विचारात घ्यावयाचे असल्याने आता नफ्यात असलेल्या आणखी बँका तोट्यात जाण्याची शक्यता आहे. नवीनधोरणामुळे तग धरून शकणाऱ्या बँका इतर बँकात विलीनीकरण होण्याची शक्यता जास्त वाटते. नागरी सहकारी बँकांना त्यांचे अस्तित्व टिकविण्यासाठी तारेवरची कसरत करावी लागणार आहे.